# कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

यांचे कार्यालय जिल्हा सोलापूर– ४१३३०४

(महाराष्ट्र शासन स्थापित)

दुरध्वनी क्रं.:०२१८६–२२४४६६/२२३५५०    फॅक्स क्रं.:०२१८६–२२०२६१

वेबसाईट: www.vitthalrukminimandir.org    इमेल: eotemple@gmail.com


जा.क्र. अन्नछत्र/का.वि./०४६/२०२१    दिनांक: २७/१२/२०२१

**प्रति,**

______________________

______________________

______________________

<u>विषय :– विविध साहित्य पुरवठा कामाचे दरपत्रक पाठविणेबाबत..</u>

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीच्या अन्नछत्र व नित्योपचार विभागासाठी कागदी चहा कप, बदामी पत्रावळी, सिल्वर पत्रावळी, बदामी द्रोण, सिल्वर द्रोण, सिल्वर डिश, फुड पॅकेट इ. साहित्य पुरवठा करणेकामी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याबाबतची माहिती व अटी, शर्ती सोबत जोडली आहे. त्याबाबतची माहिती व अटी, शर्ती www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर व संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे उपलब्ध आहे.

त्यानुसार आपलेकडे उपलब्ध असलेल्या साहित्याचे दरपत्रक छापील स्वरूपात दि. ०७/०१/२०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत इकडे सिलबंद लिफाप्यात सादर करावे ही विनंती. उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

स्वा/-

**व्यवस्थापक,**
**श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि. सोलापूर.**

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

विविध साहित्य पुरवठा कामाची जाहीर दरपत्रक

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....**

१. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून श्री.संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक अन्नछत्र विभागसाठी विविध साहित्य पुरवठा कामी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

२. पुरवठा मालाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.
  - कागदी चहा कप (८५ मिली)
  - सिल्वर पत्रावळी,
  - सिल्वर द्रोण,
  - सिल्वर डिश
  - बदामी द्रोण,
  - बदामी पत्रावळी
  - फुड पॅकेट

३. पुरवठादाराने दरपत्रक फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने इकडील मागणीप्रमाणे तात्काळ मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

४. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच मालाचा पुरवठा करणेचा आहे.

५. सर्व माल चांगल्या गुणवत्तेचा असणे आवश्यक आहे.

६. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

७. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

८. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

९. मालाचा पुरवठा करणेचे ठिकाण संत तुकाराम भवन, पंढरपूर आहे.

१०. दरपत्रकात नमुद मालाचा दर सर्व करासहीत नमुद करावा. माल पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

११. दरपत्रकात नमुद सर्व मालाचा दर नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१२. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१३. सदर कामासाठी कोणतीही अॅडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१४. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदाधारक जबाबदार राहील.

१५. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१६. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१७. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

१८. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

––––––‘‘–––––––